## बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि १८ जून २०२३

### सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३९५/२०२३ भादवि ४२०,४०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १२/०२/२०२३ रोजी १६.०० वा ते दि. १७/०६/२०२३ रोजी चे दरम्यान, गुडवन हॉस्पीटॅलीटी, प्रा.लि. कंपनी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०६/२०२३ रोजी २३.१४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विरेश शिवलिंगप्पा अंगडी, वय- ४९ वर्षे, रा. ७८९, उत्तर कसबा, कुंभार वाडा, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अमित यादव, २) करण काळे, ३) प्रेम, ४) आर्यन व इतर दोन इसम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत क्रं. १ ते ४ यांनी व इतर दोघांनी मिळफन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन पर्यटनाचे पॅकेज देतो असे सांगुन, फिर्यादीकडुन निवडलेल्या पॅकेजमधील ठरलेल्या रक्कमेपेक्षाही जादा रक्कम रु ८०,०००/- रु इतकी रक्कम काढुन घेवून फिर्यादीची फसवणुक केली आहे म्हणून. तपास:- पोना/ १९६ माडे - ८८३०५३९७०५ |

### जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३१७/२०२३ भादवि ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०७/०६/२०२३ रोजी १५.०० वा चे सुमारास, फिर्यादीचे सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०६/२०२३ रोजी १९.०८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | प्रियंका विनय दुलंगे, वय- ३३ वर्षे, रा. बलदवा नगर, स्वामी समर्थ मंदिराजवळ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) विनय दुलंगे- पती, २) आशाबाई सुरेश दुलंगे दोघे रा. बलदवा नगर, स्वामी समर्थ मंदिराजवळ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीतांनी मिळुन संगनमत करुन फिर्यादीस लाथाबुक्यांनी तसेच चामडी बेल्टने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली आहे म्हणून. सफौ/ दुधाळ- ८८४७७२२९२८ |

### विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३४६/२०२३ भादवि ४२०, आय टी ॲक्ट ६६(ड) प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | १०/०६/२०२३ रोजी १८.०० वा ते २१.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०६/२०२३ रोजी २३.५० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अपुर्वा संजय गायकवाड, वय- २६ वर्षे, रा. ०७, विजय देशमुख नगर, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | आय सी आय सी आय बॅंकेच्या मॅनेजर स्वाती दास मो. नं. ९६२८४१९०५९ |
| **फसवणुक र** | : | ६३,८१७/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे राहते घरी असताना फिर्यादीचे आय सी आय सी आय बॅंकेचे प्लॅटीनम कार्ड ॲक्टीव्ह करण्यासाठी यातील आरोपी महिला हिचे फोन आल्याने त्यांनी माहिती घेत असताना नमुद आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन बॅंकेचे मोबाईल ॲप हे वापरत होते ते ॲप ओपन करण्यास सांगुन त्यामध्ये MARCHANT OUTLET व ONLINE हे ऑपरेशन ऑन करण्यास सांगुन त्याप्रमाणे फिर्यादीने ते ऑपरेशन ऑन केले असता, सदर प्रोसेस करत |

| | | |
|---|---|---|
| | | असताना फिर्यादीस एक ओटीपी आला होता तो ओ टी पी क्रमांक फिर्यादीने आरोपीतास शेअर केल्याने काहि वेळाने फिर्यादीचे क्रेडीट कार्ड यावरुन ६३,८१७/- रु येवढे पैसे कट झाल्याचे मोबाईलवर मेसेज आल्याने फिर्यादीस एकुण ६३,८१७/- रु काढुन घेतली आहे व फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणून. तपासः- पोनि/ जगताप - **८३२९२९५०५१** |

## सलगर वस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ९९/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २९/०५/२०२३ रोजी ०३.०० वा ते ०९.०० वा चे दरम्यान, देशमुख वस्ती जवळील ब्रिजवर, दुभाजकावर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०६/२०२३ रोजी २०.५३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | श्रीधर लक्ष्मीकांतराव धम्मावलम, वय- ४२ वर्षे, रा. २६-९-७२९ ओल्ड वेदाय पालेम, नेल्लुर, राज्य आंध्रपदेश, सध्या नांदणी टोल प्लॉझा मंद्रुप, ता. द. सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ४५,०००/- रु त्यात क्रॉम्प्टन कंपनीचे २५० वॅटचे एली ई डी लाईट |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील विजापूर ते केगाव या बायपास रोडवरील नमुद ठिकाणी रोडवरीलन दुभाजकावर ch no ०३+०७० या उजवे बाजुस असलेल्या ठिकाणचे रोडचे डावे व उजवे बाजुस असलेल्या सर्व्हिस रोड करीता सन २०१९ मध्ये लावण्यात आलेल्या एकुण- ०९ पोलवरील ०९ एल ई डी लाईट फिर्यादीचे संमतीवाचून कोणीतरी अज्ञात चोरटयाने मुद्दाम लबाडीने चोरुन नेले आहे म्हणून. तपासः- पोना/ १३१८ कांबळे - |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३९६/२०२३ भादवि २७९,३३७,३३८, मोवाकाक १८४/१७७ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १७/०६/२०२३ रोजी १६.३० वा चे सुमारास, यतिराज हॉटेल च्या शेजारी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०६/२०२३ रोजी २३.५६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पल्लवी जगन्नाथ चितळे, वय- २९ वर्षे, रा. ७ गणेश बिल्डर्स, रुबी नगर, जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | शिवशरण भिमराव चव्हाण, रा. सेटलमेंट फ्रि कॉलनी नं. १, शहा नगर जवळ, सोलापूर |
| **जखमीचे नाव** | : | जगन्नाथ विश्वनाथ चितळे, वय- ६२ वर्षे, रा. ७ गणेश बिल्डर्स, रुबी नगर, जुळे सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे वडील हे कामाच्या ठिकाणाहुन चहा पिण्याकरीता बाहेर पडुन रोडच्या कडेने चालत जात असताना पाठीमागुन येणारा वरील आरोपीत हा त्याच्या ताब्यातील रिक्षा क्रं. एम एच १३ सी टी ८५०१ हि भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादीचे वडील जगन्नाथ विश्वनाथ चितळे यांना धडक देवून त्यांचे डोक्यास गंभीर जखमी करण्यास कारणीभुत झाला आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ९८७ कंचे - ८३७८९८०९८७ |

## सलगर वस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १०१/२०२३ भादवि ३९४,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १८/०६/२०२३ रोजी पहाटे ०३.०० वा ते ०३.३० वा चे दरम्यान, सेटलमेंट फ्रि कॉलनी नं. ०३, रुक्मिणी मंदिराच्या मागे, सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १८/०६/२०२३ रोजी ०७.२७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | रुपा श्रीनिवास गायकवाड, वय- २८ वर्षे, रा. सेटलमेंट फ्रि कॉलनी नं. ०३, रुक्मिणी मंदिराच्या मागे, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | दोन इसम अंदाजे वय ३० ते ३५ वयाचे एक पांढरा शर्ट व एकाने निळा शर्ट घातलेला |
| **गेला माल** | : | १) २०,०००/- रु एक ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी मंगळसुत्र<br>२) ४८,०००/- रु एक गळयातील १२ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन<br>३) १०,०००/- रु एक कानातील अडीच ग्रॅम वजनाचे सोन्याचे कर्णफुले<br>एकुण- ७८,०००/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व फिर्यादीचे दोन्ही मुले व फिर्यादीची बहिणीची मुलगी असे घरात झोपलेले असताना फिर्यादीच्या घराचा दरवाजा वाजवण्याचा आवाज आल्याने फिर्यादी या झोपेतुन उठुन दरवाजा उघडला तेव्हा फिर्यादीस दरवाजा समोर दोन इसम त्यांच्या दोघांच्या हातात घरातील वापरण्याचे चाकु होते. त्यातील पांढरा रंगाचा शर्ट घातलेला इसम हा फिर्यादीच्या घरात प्रवेश करुन फिर्यादीस हाताने ढकलुन फिर्यादीच्या गळयातील मणी मंगळसुत्र हिसकावुन घेवून व गळयातील सोन्याची चेन व कानातील सोन्याचे कर्णफुले काढुन देण्यास सांगुन त्यास फिर्यादीने विरोध केल्याने फिर्यादीस वरील आरोपीत मजकुर याने हाताने चापट मारुन चाकुचा धाक दाखवुन गळयातील चैन व कानातील कर्णफुले काढुन त्यांना दिले तेव्हा फिर्यादीस घरात पैसे कोठे आहेत ते काढुन दे असे म्हणू लागले त्यावेळी फिर्यादीच्या बहिणीची मुलगी दिपीका हि जागी झाली तेव्हा फिर्यादीने तिला घरातील कपाटातील पैसे घेवून ये असे सांगितले त्यावेळी निळा टि शर्ट घातलेला इसम हा दिपीका हिस हाताने चापट मारुन कपाटातील पैसे लवकर घेवून ये असे म्हणाला तेव्हा दिपीका हि बेडरुममध्ये जावून आरडा ओरड केल्याने दोन्ही इसम वरील वर्णनाचे ऐवज बळजबरीने घेवून गेले आहेत म्हणून. तपासः- सपोनि- शेख ९२८४३८८९६६ |